MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १६ अंक : ५ पाने : ८ ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

ग्लोबल वॉर्मिंगमुळे येणारी वादळे आणि कोरोना महामारीचे संकट, यामुळे आपल्या सर्वांच्या दृष्टीने सध्याचा काळ अतिशय कसोटीचा बनला आहे. अशा या संकटांमध्ये कधी-कधी माणूस हतबल होताना दिसतो आहे. पण अत्यावश्यक सेवा देणाऱ्या आपल्या महापारेषणमध्ये काम करणाऱ्या आपल्या सर्वांकडून समाजाच्या वेगळ्या अपेक्षा आहेत. केवळ त्या अपेक्षा पूर्ण करावयाच्या म्हणून नव्हे, पण समाजातील एक जबाबदार घटक म्हणून

- **दोनशे लसीकरण वाहनांचे हस्तांतरण**
- **२५ कोटींचा सीएसआर निधी**
- **देशातील हा पहिलाच प्रयोग**
- **टीमवर्कने काम करा**

आपण संकटांचे हे आव्हान पेलण्याचा प्रयत्न करत आहोत.

नागपूरमधील मानकापूर येथे सद्‌भावना जीवनरथ दोनशे लसीकरण वाहनांचे महापारेषणने सरकारला केलेले हस्तांतरण या घटनेचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल. विदर्भ सहायता सोसायटी आणि महापारेषण यांच्या संयुक्त विद्यमाने सद्‌भावना जीवनरथ दोनशे लसीकरण वाहनांचे हस्तांतरण मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दृकश्राव्य प्रणालीव्दारे करण्यात आले. याप्रसंगी मा. ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, मा. महसूलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात, मा. पशुसंवर्धनमंत्री श्री. सुनील केदार, मा. महिला व बालविकासमंत्री श्रीमती यशोमती ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.

लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी २५ कोटी रुपयांचा सीएसआर निधी महापारेषण कंपनीतर्फे विदर्भ सहायता सोसायटीला उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या निधीतून विदर्भातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना दोनशे लसीकरण वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. जे नागरिक लसीकरण केंद्रांपर्यंत पोहोचू शकत नाहीत, अशा नागरिकांच्या घरी जावून लसीकरण करण्यासाठी दोनशे लसीकरण वाहने उपयुक्त ठरणार आहेत. लसीकरणासाठी संपूर्ण मदत देण्यात येणार असून जास्तीत-जास्त नागरिकांचे लसीकरण करणे आवश्यक आहे.

सद्‌भावना जीवनरथाच्या माध्यमातून विदर्भातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी लसीकरण वाहने महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. संत गाडगे महाराजांचा संदेश अंमलात आणून मेळघाट, गडचिरोली यासारख्या अतिदुर्गम भागात पोहोचून लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याला प्राधान्य राहणार आहे. ऊर्जा विभागाचा दोनशे लसीकरण वाहने उपलब्ध करुन देण्याचा देशातील व राज्यातील हा पहिलाच उपक्रम आहे.

नागपूर व अमरावती विभागातील सर्व तालुक्यांना प्रत्येकी दोन वाहने याप्रमाणे दोनशे वाहने देण्यात येत आहेत. या वाहनांचा सुयोग्य वापर व्हावा, तसेच वाहनांची देखभाल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी नियंत्रण अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तसेच लसीकरणासाठी वापराचा नियमित अहवाल विभागीय आयुक्तांनी घ्यावा, अशी सूचना मा. ऊर्जामंत्री महोदयांनी या कार्यक्रमाच्या वेळी केली आहे.

कोविड-१९ संदर्भात राज्य शासनाच्या विविध उपाययोजनांना आर्थिक बळ म्हणून महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला मदत करण्यात आली. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी



**दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

जोपासत मुख्यमंत्री सहाय्यता निधीला केलेल्या मदतीबद्दल मा. मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी कौतुक करीत समाधान व्यक्त केले.

नवी दिल्ली येथील ग्रीनटेक फाऊंडेशनच्या वतीने कोरोना योध्दा गटात दिला जाणारा ग्रीनटेक सीएसआर इंडिया पुरस्कार महापारेषणला जाहीर झाला. तसेच ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार-२०२१ मला मिळाला. खरं म्हणजे हे श्रेय तुमचेच आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या टीमवर्कमुळे हे शक्य झाले आहे, हे मी नम्रपूर्वक सांगू इच्छितो. सांघिक व्यवस्थापन आणि कंपनीच्या शाश्वत व निरंतर प्रगतीसाठी काम करणाऱ्या नेतृत्वाचा या पुरस्काराने गौरव केला जातो. गेले काही वर्षे महापारेषण जे नावीन्यपूर्ण उपक्रम करत आहे, त्याचीच ही पावती आहे. भविष्यातही आपण असेच सांघिक भावनेने कराल, अशी मला आशा आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक







**नागपूर :** मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रांगणात विदर्भ सहायता सोसायटी आणि महापारेषण यांच्या संयुक्त विद्यमाने सद्भावना जीवनरथ दोनशे लसीकरण वाहनांचे हस्तांतरण मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दृकश्राव्य प्रणालीव्दारे करण्यात आले. याप्रसंगी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, महसूलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात, पशुसंवर्धनमंत्री श्री. सुनील केदार, महिला व बालविकासमंत्री श्रीमती यशोमती ठाकूर, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, विभागीय आयुक्त श्रीमती प्राजक्ता लवंगारे-वर्मा, नागपूरच्या जिल्हाधिकारी आर. विमला.

## सद्भावना जीवनरथ लसीकरण वाहनांचे हस्तांतरण

# कोरोनाच्या तिसऱ्या लाटेवर मात करण्यासाठी लसीकरणच एकमेव पर्याय : मुख्यमंत्री

*टीम महापारेषण, नागपूर*

कोरोनावर सध्या प्रभावी औषध नसल्यामुळे लस ही ढाल म्हणून काम करीत आहे. येत्या काळात कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण आवश्यक असून कोरोनावर मात करण्यासाठी आपण सज्ज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी सद्भावना जीवनरथ लसीकरण दोनशे वाहनांच्या हस्तांतरण समारंभाप्रसंगी केले.

मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलाच्या प्रांगणात विदर्भ सहायता सोसायटी आणि महापारेषण यांच्या संयुक्त विद्यमाने सद्भावना जीवनरथ दोनशे लसीकरण वाहनांचे हस्तांतरण मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दृकश्राव्य प्रणालीव्दारे करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

महापारेषण कंपनीतर्फे लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी २५ कोटी रुपयांचा सीएसआर निधी विदर्भ सहायता सोसायटीला उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या निधीतून विदर्भातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना दोनशे लसीकरण वाहने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. या लसीकरण वाहनांचे हस्तांतरण महसूलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर राज्याचे ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री डॉ. नितीन राऊत, पशुसंवर्धनमंत्री श्री. सुनील केदार, महिला व बालविकासमंत्री श्रीमती यशोमती ठाकूर तसेच दृकश्राव्य प्रणालीव्दारे आरोग्यमंत्री श्री. राजेश टोपे, कौशल्य विकासमंत्री श्री. नवाब मलिक, गृहराज्यमंत्री श्री. शंभूराज देसाई, रोजगार हमी योजनामंत्री श्री. संदीपान भुमरे, इतर जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे, आमदार श्री. राजू पारवे, महापालिकेचे विरोधी पक्ष नेता श्री. तानाजी वनवे, विभागीय आयुक्त श्रीमती प्राजक्ता लवंगारे-वर्मा, जिल्हाधिकारी श्रीमती आर. विमला आदी उपस्थित होते.

कोरोनासोबतच अतिवृष्टी व पुरासारख्या संकटाचा सामना करताना जनतेच्या संरक्षणाला प्राधान्य देण्यात आल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, ``राज्यात ५ कोटीपेक्षा जास्त नागरिकांना पहिला व दुसरा डोस देण्यात आला आहे. एका दिवशी ९ लाखांपेक्षा जास्त डोस देण्यात आले आहेत. केंद्र शासनातर्फे जेवढे जास्त डोस उपलब्ध होतील, त्यानुसार सर्वांना लस देण्यात येईल. जे नागरिक लसीकरण केंद्रांपर्यंत पोहोचू शकत नाहीत, अशा नागरिकांच्या घरी जावून लसीकरण करण्यासाठी दोनशे लसीकरण वाहने उपयुक्त ठरणार आहेत. लसीकरणासाठी संपूर्ण मदत देण्यात येणार असून जास्तीत-जास्त नागरिकांचे लसीकरण करणे आवश्यक आहे.``

लसीकरण वाहनांचे हस्तांतरण व मोहिमेचा शुभारंभ करताना महसूलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात म्हणाले की, ``सद्भावना जीवनरथाच्या माध्यमातून विदर्भातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी लसीकरण वाहने महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. संत गाडगे महाराजांचा संदेश अंमलात आणून मेळघाट, गडचिरोली यासारख्या अतिदुर्गम भागात पोहोचून लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्याला प्राधान्य राहणार आहे. ऊर्जा विभागाचा दोनशे लसीकरण वाहने उपलब्ध करुन देण्याचा देशातील व राज्यातील हा पहिलाच उपक्रम असून राजीव गांधी यांच्या जन्मदिनी म्हणजेच सद्भावना दिनी आयोजित होत आहे.``

आरोग्यमंत्री श्री. राजेश टोपे यांनी तिसऱ्या लाटेच्यासंदर्भात लसीकरण महत्त्वाचे असून जनतेला या महामारीपासून दूर ठेवण्यासाठी दोनशे लसीकरण वाहने उपलब्ध केल्याबद्दल विदर्भ सहायता सोसायटी व महापारेषणचे विशेष अभिनंदन केले. आगामी काळातील सण व उत्सव साजरे करताना कोविडचा प्रोटोकॉल तंतोतंत पाळला जाईल, याची खबरदारी नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात ऊर्जामंत्री तथा पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेचा सामना करताना आरोग्य विभागाला ऑक्सिजनसह आवश्यक वैद्यकीय सुविधा पुरविण्याला प्राधान्य दिले आहे. तिसऱ्या लाटेचा सामना करताना लसीकरण अत्यंत आवश्यक असल्यामुळे महापारेषण कंपनीतर्फे २५ कोटी रुपयांचा सीएसआर निधी विदर्भ सहायता समितीला उपलब्ध करुन दिल्यामुळे नागपूर व अमरावती विभागातील सर्व तालुक्यांना प्रत्येकी दोन वाहने याप्रमाणे दोनशे वाहने देण्यात येत आहेत. या वाहनांचा सुयोग्य वापर व्हावा तसेच वाहनांची देखभाल करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी नियंत्रण अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. तसेच लसीकरणासाठी वापराचा नियमित अहवाल विभागीय आयुक्तांनी घ्यावा, अशी सूचना ऊर्जामंत्र्यांनी यावेळी केली.

प्रारंभी सद्भावना दिनानिमित्त माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. तसेच दीपप्रज्वलित करुन दोनशे सद्भावना जीवनरथाचे हस्तांतरण केले. नागपूर विभागासाठी १२८ लसीकरण वाहनांचे हस्तांतरण विभागीय आयुक्त श्रीमती प्राजक्ता लवंगारे-वर्मा यांना तर अमरावती विभागासाठी ७२ लसीकरण वाहनांचे हस्तांतरण महिला व बालविकासमंत्री श्रीमती यशोमती ठाकूर यांना करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय आयुक्त श्रीमती प्राजक्ता लवंगारे-वर्मा यांनी तर आभार जिल्हाधिकारी आर. विमला यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपायुक्त आशा पठाण यांनी केले.

**सर्वांसाठी वीज**

■ ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते भूमिपूजन ■

# १३२ के.व्ही. पारडी ते जाटतरोडी विद्युत वाहिनीच्या कामाचा शुभारंभ

■ *टीम महापारेषण, नागपूर*

पारडी ते जाटतरोडी १३२ के.व्ही. द्विपथ भूमिगत अति उच्च दाब विद्युत वाहिनीच्या कामाचे भूमिपूजन ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते झाले.

नागपूर शहरात बेसा, पारडी या परिसराचा झपाट्याने विकास होत असल्याने विद्युत ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भविष्यातील वीज मागणीची गरज लक्षात घेऊन १३२/३३ के.व्ही. जाटतरोडी उपकेंद्र उभारले जात असल्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले.

१३२ के.व्ही. चे जाटतरोडी उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर पारडी, बेसा व उप्पलवाडी येथील उपकेंद्राचा विद्युत भार कमी होणार आहे. या भागातील ग्राहकांना योग्य दाबाने विद्युत पुरवठा होणार आहे. जाटतरोडी उपकेंद्रातून ३३ के.व्ही. च्या १२ फिडरचे कामही प्रस्तावित आहे.

१३२ के.व्ही. जाटतरोडी उपकेंद्र शहराच्या मध्यवर्ती भागात येत असल्यामुळे महावितरणच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असल्याचे सांगून ऊर्जामंत्री डॉ. राऊत पुढे म्हणाले, ``१३२ के. व्ही. जाटतरोडी अति उच्च दाब उपकेंद्रातून शहरातील पूर्व, मध्य व दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातील ग्राहकांना अखंडित व योग्य दाबाने वीजपुरवठा होणार आहे.`` याप्रसंगी महापारेषणचे नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, महावितरणचे नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता (अउदा संवसु) श्री. सतिश अणे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अविनाश कसबेकर, अधीक्षक अभियंता (चाचणी व संचारण) श्री. संजय आत्राम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**नागपूर :** १३२ के.व्ही. पारडी ते जाटतरोडी द्विपथ भूमिगत अति उच्च दाब विद्युत वाहिनीच्या कामाचे भूमिपूजन व कोनशिलेचे अनावरण करताना ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. शेजारी महापारेषणचे नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अविनाश कसबेकर.

---

**सन्मान कार्याचा**

■ खासदार डॉ. फारूक अब्दुला यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण ■

# महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांना ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार प्रदान

■ *टीम महापारेषण, मुंबई*

नवी दिल्ली येथील ग्रीनटेक फौंडेशनच्या वतीने दिला जाणारा यंदाचा ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार-२०२१ हा जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार डॉ. फारूक अब्दुला यांच्या हस्ते महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. जम्मू आणि काश्मीरमधील सोनमर्गमध्ये झालेल्या ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर परिषदेत हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी जम्मू आणि काश्मीरचे माजी पर्यावरण व वनसंपदामंत्री मिया अल्ताफ अहमद, ग्रीनटेक फाऊंडेशनचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कमलेश्वर शरण, महापारेषणचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी उपस्थित होते.

कंपन्यांनी केलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांसाठी व उल्लेखनीय कामगिरीसाठी हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. सांघिक व्यवस्थापन आणि कंपनीच्या शाश्वत व निरंतर प्रगतीसाठी काम करणाऱ्या नेतृत्वाचा या पुरस्काराने गौरव केला जातो. या पुरस्काराबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी श्री. दिनेश वाघमारे यांचे अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे कंपनीचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.



**सोनमर्ग :** नवी दिल्ली येथील ग्रीनटेक फौंडेशनच्या वतीने दिला जाणारा यंदाचा ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार-२०२१ हा जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार डॉ. फारूक अब्दुला यांच्या हस्ते महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी जम्मू आणि काश्मीरचे माजी पर्यावरण व वनसंपदामंत्री मिया अल्ताफ अहमद, ग्रीनटेक फाऊंडेशनचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कमलेश्वर शरण.



**ऐरोली :** महापारेषणने ऐरोली येथे ट्रान्समिशन असेट मॅनेजमेंट सेंटरची स्थापना केली आहे. त्याला भेट देऊन मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर यांच्याकडून माहिती घेताना महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे. शेजारी महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे व अन्य अधिकारी.

*स्वयंचलन क्षेत्रात महापारेषणचे मोठे पाऊल*

# ऐरोलीत ट्रान्समिशन असेट मॅनेजमेंट सेंटरची स्थापना

*टीम महापारेषण, ऐरोली*

महापारेषणने ऐरोली येथे महाराष्ट्र ट्रान्समिशन असेट मॅनेजमेंट सेंटरची स्थापना केली आहे. त्यामुळे महापारेषणने स्वयंचलन (Automation) क्षेत्रात एक मोठे पाऊल टाकले आहे.

या प्रकल्पामध्ये सध्या २२ उपकेंद्राचे संचलन करणे व ऐरोली येथील कंट्रोल सेंटरमध्ये इंटिग्रेट करण्याचे काम आहे. भविष्यात टप्प्याटप्प्याने महापारेषणचे ४०० के. व्ही., २२० के. व्ही. व १३२ के. व्ही. चे सर्व उपकेंद्र, ऐरोली येथील MTAMC कंट्रोल सेंटरमध्ये इंटिग्रेट करण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचे उद्दिष्ट् म्हणजे पारेषण संरक्षण प्रणाली व्यवस्थापन व स्वयंचलित पारेषण दोष याचे विश्लेषण याव्दारे महापारेषणच्या ग्रीडमध्ये कुठेही दोष (Occurrence) झाला तर त्याची अद्ययावत माहिती तात्काळ अगदी काही सेकंदात संबंधितांना मिळणार आहे. दोषाच्या विश्लेषणाचा पूर्ण अहवाल मेलव्दारे काही मिनिटातच संबंधितांना कळविला जाईल. त्यामुळे ग्रीड पुन्हा चालू करण्यासाठी अत्यंत कमी वेळ लागणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन वीजपुरवठा सुरळीत व तात्काळ होणार आहे.

व्हीडिओ निरीक्षण व्यवस्थापन (VMS) याव्दारे उपकेंद्राची 24x7 देखरेख करता येणार आहे. प्रत्येक उपकरणांची अद्ययावत पाहणी उपकेंद्र व कंट्रोल सेंटरला करता येईल. उपकेंद्राचे दूरस्थ नियंत्रण (Substation Remote Control) यामुळे उपकेंद्राचे कंट्रोल सेंटरमधून नियंत्रण करता येणार आहे.

पारेषण उपकरणे व्यवस्थापन व कार्पोरेट डेटा वेअरहाऊस याव्दारे महापारेषणच्या विविध प्रणालीमध्ये असलेला सर्व प्रकारचा डाटाचा उपयोग करून प्रत्येक उपकरणाचे व्यवस्थापन करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

सदर प्रकल्पाचे काम प्रगतिपथावर आहे. दरम्यान, या प्रकल्पाची पाहणी महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे यांनी केली. यावेळी मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर यांनी या प्रकल्पाची अद्ययावत माहिती दिली.

या प्रकल्पाचे काम मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकारी अभियंता श्री. सुनिल बनसोड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. आशिष भुते, सहाय्यक अभियंता श्री. नितीन आष्टा, श्री. संतोष दुधावळे, तन्वी ढाले करत आहेत.




हृद्य सत्कार

■ महापारेषणचा गौरव ■

# संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रातर्फे श्री. दिनेश वाघमारे यांचा सत्कार

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

राज्याच्या ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांना प्रतिष्ठेचा ग्रीनटेक लिडिंग डायरेक्टर पुरस्कार मिळाल्याबद्दल संबोधी अकादमी महाराष्ट्र संचलित संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, औरंगाबादच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

समाजभूषण श्री. भीमराव हत्तीअंबिरे अध्यक्षस्थानी तर प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता श्री. एस. एस. भगत, श्री. गणेश राठोड, श्री. विजय कानेकर आदी उपस्थित होते. याप्रसंगी महापारेषणचे अधीक्षक अभियंता सर्वश्री आर. पी. चव्हाण, प्राचार्य निशिकांत आल्टे, रोहिदास अल्हाट, नफीस खान, कृष्णा भंडारे, राहुल उघडे आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री सोनाजी गवई, रवींद्र गवई, योगेश चवरे, संजय शेलार, प्रदीप सारोळे, दिगंबर गायकवाड, गणेश खरात, गजानन अंभोरे, सतीश कांबळे, रूपेश पाईकराव, रवी गाडेकर, सुदीप नामवाड, कपिल इंगोले, दीपाली हिवराळे यांनी परिश्रम घेतले. प्रा. भाग्यश्री सातदिवे, इंजिनिअर स्वाती जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कोमल मोरे यांनी आभार मानले.



**औरंगाबाद :** राज्याच्या ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. दिनेश वाघमारे यांचा सत्कार करताना संबोधी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्राचे श्री. भीमराव हत्तीअंबिरे व अन्य मान्यवर.

शिक्षण-प्रशिक्षण

■ महापारेषण आणि त्रिशरण फाउंडेशन यांचा कृतिशील अभिनव उपक्रम ■

# पाळी व्यवस्थापन या विषयावर पुण्यात कार्यशाळा

■ *टीम महापारेषण, पुणे*

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण व समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाटन महापारेषणचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी) श्री. सुगत गमरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत कुलकर्णी हे होते. या कार्यक्रमाला महापारेषणच्या अधीक्षक अभियंता श्रीमती चारूता बेंद्रे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. प्रशांत चौधरी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



**पुणे :** महापारेषण व त्रिशरण फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण व समुपदेशन कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी 'ऐक सखे' या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करताना महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे. शेजारी पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. जयंत कुलकर्णी, श्रीमती चारूता बेंद्रे, श्री. प्रशांत चौधरी, श्री. भरत पाटील, श्रीमती प्रज्ञा वाघमारे.

या कार्यक्रमाला ग्रीनतारा फाउंडेशनच्या संचालिका डॉ. मंदा मुने मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. प्रास्ताविक त्रिशरण एनलाईटनमेंट फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती प्रज्ञा वाघमारे यांनी केले. या प्रशिक्षण व समुपदेशन कार्यक्रमात कीर्ती ठाकूर व विकासदूत प्रकल्पाचे राज्य समन्वयक श्री. दिगंबर वाघ यांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळी, मासिक पाळीचे चक्र, या कालावधीत घ्यावयाची स्वच्छता, आहार आणि काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महापारेषण व त्रिशरण एनलाईटनमेंट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याच कार्यक्रमात पुणे महानगरपालिकेच्या डॉ. नानासाहेब परूळेकर विद्यालयात शिकणारी विश्रांतवाडी येथील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत दहावीमध्ये ९५ टक्के गुण मिळवणाऱ्या शंकेश्वरी लष्करे या गुणवंत विद्यार्थिनीला त्रिशरण एनलाईटनमेंट फाउंडेशनतर्फे धनादेश देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शिल्पा शिवनकर यांनी केले. तर आभार प्रकल्प व्यवस्थापक श्री. प्रशांत वाघमारे यांनी मानले.


मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
मी जबाबदार
महाराष्ट्र शासन
माझा मास्क. माझी सुरक्षा.



**नागपूर :** अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ नागपूर येथे ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



**नागपूर :** अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ नागपूर येथे ७५ व्या स्वातंत्र्यदिनी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. अविनाश कसबेकर, श्री. अभय रोही यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी वर्ग.

# भारताचा स्वातंत्र्यदिन नागपूरमध्ये उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, नागपूर*

अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ नागपूर येथे ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सुरूवातीला ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी ७५ वा स्वातंत्र्यदिन कार्यक्रमास परिमंडळ कार्यालय व परिमंडळ कार्यालयांतर्गत प्रविभाग व विभाग येथील अधिकारी व कर्मचारी वर्ग यांनी शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करत मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या व सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून परिमंडळ नागपूर कार्यालयाच्या परिसरात प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे व परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी व परिमंडळ कार्यालयाच्या परिसरात अधिकारी व कर्मचारी यांची वसाहत असल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना चांगले आरोग्य लाभण्याच्या दृष्टिकोनातून खुल्या व्यायामशाळेच्या उद्घाटनाचा कार्यक्रमदेखील यावेळी पार पडला.

याप्रसंगी नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता (पा.) श्री. सतिश अणे, अधीक्षक अभियंता (पा.) श्री. अविनाश निंबाळकर, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. अविनाश कसबेकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. पीयूष चिक्षे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) सौ. प्रणोती बुंदाले, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. पी. बी. परचाके यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन कराड परिमंडळामध्ये उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, कराड*

कराड परिमंडळामध्ये भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरूवातीला अति उच्च दाब नि संचलन व सुव्यवस्था, कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल त्यांचा मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी अधीक्षक अभियंता सौ. शिल्पा कुंभार, सहाय्यक मुख्य दक्षता अधिकारी श्री. किशोर पाटील, चाचणी विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती सुनिता कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. पद्माकर जोशी, सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रभारी) श्री. राजू कोळी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व्यवस्थापक (मा.सं.) श्री. देवराज सूर्यवंशी व अशोक पारधी व इतर कर्मचाऱ्यांनी केले.



**कराड :** परिमंडळामध्ये भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप. शेजारी अधीक्षक अभियंता सौ. शिल्पा कुंभार, श्री. किशोर पाटील, श्रीमती सुनिता कुलकर्णी, श्री. पद्माकर जोशी, श्री. राजू कोळी व अन्य.



विजयी विश्व तिरंगा प्यारा...




**मुंबई :** महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीत ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर. शेजारी ध्वजारोहणप्रसंगी उपस्थित वरिष्ठ अधिकारी वर्ग.

# महापारेषणमध्ये ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय, मुंबई*

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे भारताचा ७५ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरूवातीला महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांनी ध्वजारोहण केले. यावेळी महापारेषणचे कार्यकारी संचालक (संचलन) श्री. श्रीकांत राजूरकर, कार्यकारी संचालक (मा. सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. संजय कुमार, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. सचिन खडगी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कराड परिमंडळात अभियंता दिन उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, कराड*

कराड परिमंडळातील सभागृहात मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांच्या अध्यक्षतेखाली अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांच्या हस्ते झाले. महिला अभियंता कर्मचारी यांच्या हस्ते केक कापून अभियंता दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. पद्माकर जोशी यांनी केले. अभियंता दिन ज्यांच्या स्मरणार्थ साजरा होतो त्या मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जीवनकाळ तसेच कार्यकाळाचे विवेचन केले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. चिदाप्पा कोळी, कार्यकारी अभियंता श्री. संपत जाधव, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्रभारी) श्री. राजू कोळी, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. मंगेश खराटे यांचेसह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली.



**कराड :** परिमंडळातील सभागृहात अभियंता दिनानिमित्त सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करताना मुख्य अभियंता सर्वश्री अनिल कोलप. शेजारी अधीक्षक अभियंता चिदाप्पा कोळी, कार्यकारी अभियंता संपत जाधव, राजू कोळी, मंगेश खराटे व अन्य अधिकारी.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती ऑगस्ट-सप्टेंबर

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | **संदीप सूरज कलंत्री** | मुख्य अभियंता (पारेषण) | अभिकल्प, सांघिक कार्यालय, मुंबई | २३.०८.२०२१ |
| २ | **संजीव गोपाळ भोळे** | मुख्य अभियंता (पारेषण) | राज्य पारेषण उपक्रम, सांघिक कार्यालय, मुंबई | २५.०८.२०२१ |
| ३ | **रवींद्र नामदेवराव नागरे** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प मंडल, कळवा | १३.०८.२०२१ |
| ४ | **अजय विनोदराय पटेल** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | नियामक आणि वाणिज्य कक्ष, सांघिक कार्यालय, मुंबई | १७.०८.२०२१ |
| ५ | **दत्ता बाबूराव जाधवर** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसू मंडल, पनवेल | २३.०८.२०२१ |
| ६ | **सुरेश दशरथ देवगुणे** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | चाचणी व दूरसंचार मंडल, वाशी | १८.८.२०२१ |
| ७ | **चिदाप्पा लिंगप्पा कोळी** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडल, कराड | १७.०८.२०२१ |
| ८ | **निशीत विनोद किरोळीकर** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | उदादिधा ग्रहणकेंद्र संवसु मंडल, चंद्रपूर | १७.०८.२०२१ |
| ९ | **अमित रामचंद्र नाईक** | अधीक्षक अभियंता (पारेषण) | राज्य पारेषण उपक्रम, सांघिक कार्यालय, मुंबई | १७.०८.२०२१ |
| १० | **सचिन भाऊराव खडगी** | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | सांघिक कार्यालय, मुंबई | १७.०८.२०२१ |
| ११ | **अतुल चंद्रकांत मनुरकर** | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | अउदा स्थापत्य नि सुव्यवस्था मंडल, कोल्हापूर | २४.०८.२०२१ |

### निवृत्ती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | **श्री. संजय कुमार** | मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३०.०९.२०२१ |

*From the Desk of ED, HR*

# कामे करूया स्मार्ट होऊन!




आपल्या दैनंदिन कामांमध्ये सतत सुधारणा आणि नव्या कल्पनांचे स्वागत याला आधुनिक जगामध्ये अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. दैनंदिन कामांतील सुधारणा आणि नव्या कल्पनांना मोकळी वाट कशी करून द्यायची आणि आपण त्यासाठी नेमके काय करायचे, असा प्रश्न आपल्याला पडू शकतो. खरे म्हणजे कामांत सतत सुधारणा करणे, हे एक जबाबदार सेवक म्हणून आपले कर्तव्यच असते. तसेच नव्या कल्पनांचे स्वागत करणे, हे कंपनी जिवंत असल्याचे लक्षण असते.

आपल्या कामात सुधारणा करावयाची, म्हणजे काय करावयाचे, या प्रश्नाचे अगदी सोपे उत्तर म्हणजे आपण जे काम करत असतो, त्याच कामापुरते आपण आपले कौशल्य वापरत असू तर त्यात बदल करणे होय. म्हणजे आपल्याकडे त्यापेक्षा अधिक कौशल्ये असू शकतात. पण ते आपले काम नाही, म्हणून त्यांचा आपण वापर करत नाही. तसे न करता त्या कौशल्याचा सराव करत राहणे किंवा आपल्याकडे नसलेल्या कौशल्यांचा अंगीकार करणे, यातून आपण आपल्या कामात सातत्याने सुधारणा घडवून आणू शकतो.

जेव्हा आपण अशी नवी कौशल्ये वापरू लागतो, तेव्हा आपल्या कामाच्या पलीकडे अजिबात न पाहणारी मंडळी आपल्या आजूबाजूला असतातच. ते आपल्याला अधिक कौशल्ये वापरण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत असतात. आपल्याला अधिक कामे करावी लागतील, अशी भीती अशांना वाटत असते. ज्याला अधिक कौशल्ये आत्मसात करावयाची आहेत, त्यांनी अशा सहकाऱ्यांना कटाक्षाने दूर ठेवले पाहिजे. साध्या कामांचा ताण घेणे किंवा त्याला सतत घाबरत रहाणे, अशी अनेकांना सवय असते. असे का होते, याचा शोध घेतला तर असे लक्षात येते की, नवे तंत्रज्ञान शिकून घेण्याची त्यांची तयारी नसते. आपण कामाला जेव्हा सुरवात केली, तेव्हा ज्या पध्दतीने काम केले, त्याच पध्दतीने वर्षानुवर्षे आपण काम करत राहू, असे त्यांना वाटत असते. पण आधुनिक काळात इतक्या वेगाने अनेक गोष्टी बदलत आहेत की नवी कौशल्ये आत्मसात करणे, ही एक अपरिहार्यताच झाली आहे. ती ज्यांनी ओळखली नाही, तेच कामाचा ताण घेत असतात.

आपल्या कामाच्या प्रती जे बांधिलकी जपतात, त्यांना आजचे काम कालच्यापेक्षा चांगले झाले पाहिजे, असे वेगळे सांगण्याची गरज अजिबात रहात नाही. कारण, ते स्वयंप्रेरित असतात. आपली कार्यक्षमता अधिकाधिक वाढली पाहिजे आणि त्यासाठी आपली कामे अधिक स्मार्ट पध्दतीने केली पाहिजेत, याची त्यांना जाणीव असते. त्यामुळेच असे कर्मचारी हे सर्वांना प्रिय असतात. काम करणाऱ्याला प्रत्येकाला असे वाटत असते की आपण जे काम करतो, त्याची कोणीतरी दखल घेतली पाहिजे, त्याला मान्यता दिली पाहिजे. असे वाटणे हे अगदी नैसर्गिक आहे. पण ती मान्यता मिळत नाही, अशी अनेकांची भावना होत रहाते. याचेही कारण आपले काम अधिक चांगल्या पध्दतीने होईल, असा प्रयत्न न करणे, हेच आहे. उदा. तुम्हाला आतापर्यंत संगणक वापरण्याची कधी गरज पडली नसेल, पण जेव्हा तुमच्या लक्षात आले की आपण आपल्या कामासाठी संगणक वापरू शकतो. जेव्हा तुम्हाला हे वाटले, तेव्हा काम स्मार्ट पध्दतीने करण्याची प्रेरणा तुमच्यात निर्माण झाली. मग तुम्ही ते स्वत:हून करू लागता. तेव्हा तुम्ही करत असलेल्या कामाला लवकर मान्यता मिळण्याची शक्यता असते. लक्षात घ्या, ही स्वप्रेरणा असते. त्यामुळे ते काम आपल्यावर कोणीतरी लादले आहे, अशी त्यात भावना नसते. शिवाय, आपल्याला नवीन गोष्ट शिकून घेतल्याचे समाधान मिळते, ते वेगळेच!

कर्मचाऱ्यांनी नवी कल्पना मोकळेपणाने सहकाऱ्यांसमोर मांडणे तसेच त्याविषयी आपल्या वरिष्ठांशी सल्लामसलत करणे. नव्या कल्पना मांडणारे कर्मचारी कोणत्याही व्यवस्थापनाला हवेसे असतात, कारण त्यातून कंपनीची प्रगती होणार असते. जेवढ्या नव्या कल्पना मांडणारे कर्मचारी तेवढी अधिक ती कंपनी वेगाने पुढे जाते. अर्थात, अशा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देत रहाणे, ही त्या व्यवस्थापनाची जबाबदारीच असते.

अशा नव्या पध्दतीचा शोध घेणे किंवा आपल्या सहकाऱ्याने नव्या कल्पना मांडल्या तर त्याचे स्वागत करणे, किमान त्याविषयी कुतूहल बाळगणे, याचा अर्थ त्या बदलाविषयीचा सकारात्मक विचार करणे. जो असा सकारात्मक विचार करतो, तो त्याच्या व्यक्तिमत्वाचा भाग होत असतो. मग केवळ कंपनीतच नव्हे तर जगात वावरतानाही ही सकारात्मकता उपयोगी पडते. काही जण असेही असतात की त्यांना अनेक कल्पना सुचत असतात. पण, त्यातील एकही पुढे जात नसते. त्याचे कारण त्यानुसार कृती करण्याचे त्यांचे धाडस होत नाही. याचा अर्थ नव्या कल्पना केवळ मनात ठेवून नाही, तर त्या दिशेने जाण्याचे पहिले पाऊल टाकणेही आवश्यक असते. आणखी एक गोष्ट महत्त्वाची, ती म्हणजे कंपनीमध्ये आपण कसे वातावरण निर्माण करतो? आपण खेळीमेळीच्या वातावरणात कामे करू शकतो काय? आपल्याला अधिक चांगले काम करण्याची किंवा नव्या कल्पना मांडण्याचे स्वातंत्र्य आहे काय? खेळीमेळीच्या आणि स्वातंत्र्याच्या वातावरणात अधिक चांगली कामे होतात, हे विसरता कामा नये.

**शुभेच्छांसह..!**

**– सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**

**संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**
E-mail : prohr@mahatransco.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)**

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.